ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १६ सप्टेंबर, १९५३ अंक ३७

## विविध माहिती

**भारताची कच्च्या फिल्मची आयात**—गेल्या वर्षीं भारतानें २४,७६,४१,००० फूट लांबीची कच्ची फिल्म आयात केली. तिची किंमत १,६६,०७,००० रुपये झाली. भारतामधील चित्रपटांच्या निर्मितींत मात्र फारशी वाढ झालेली नाहीं. त्यावरून असा निष्कर्ष काढण्यांत येत आहे कीं, चित्रपटांच्या अनेक प्रती काढण्यांत येत असाव्या.

**रशिआमधील त्रिमिति-पट**—पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी नुकत्याच रशिआंत जाऊन आल्या. तेथील मुक्कामांत मॉस्कोमधील चित्रपट-गृहांत एक रशिअन त्रिमिति-चित्रपट त्यांनीं पाहिला. चित्रपट पाहाण्यासाठीं रंगीत चष्मा लागला नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

**भारतीय कादंबरीचें भाषांतर**—त्रावणकोर येथील कादंबरी-लेखक श्री. राजा राव सध्यां स्वीडनमध्यें 'भारतीय संस्कृति आणि तत्त्वज्ञान ' ह्या विषयावर व्याख्यानें देत फिरत आहेत. त्यांच्या एका कादंबरीचें स्वीडिश भाषांतर ' इंडिअन व्हिलेज ' ह्या नांवानें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

**जोधपूर येथील प्रदर्शन**—येत्या नोव्हेंबर महिन्यांत जोधपूर येथें एक औद्योगिक व शेती-प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत मांडल्या जाणाऱ्या विकाऊ मालावर कर न घेण्याचें राज्य-सरकारनें जाहीर केलें आहे. प्रदर्शनांत ग्रामोद्योगाचा माल, खनिजें, बँकिंग, विमा, आरोग्य, शिक्षण, इत्यादि विषयांचें साहित्य ठेवण्यांत येईल.

**शिवण्याच्या यंत्रांचें उत्पादन**—प. जर्मनींत हल्लीं दररोज २,५०० शिवण्याच्या यंत्रांचें उत्पादन होतें, तरीसुद्धां तें मागणी-पेक्षां कमी पडतें. उत्पादनापैकीं ६० टक्के माल परदेशीं निर्यात करण्यांत येतो. युद्धापूर्वीं जर्मनींत दर तीन कुटुंबामागें एक असें शिवण्याच्या यंत्राचें प्रमाण होतें. आतां दर सहा कुटुंबामागें एक, असें प्रमाण पडतें.

**काश्मीरला जाण्याचे विमानाचे दर**—काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाशांची संख्या वाढावी म्हणून इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशन काश्मीरच्या प्रवासाचे दर कमी करण्याचा विचार करीत आहे. कॉर्पोरेशनच्या नोकरवर्गाच्या प्रॉव्हिडंट फंडाची व्यवस्था पहाण्यासाठीं बोर्ड ऑफ ट्रस्टिज स्थापन करण्याचेंहि घाटत आहे.

**हा चोर विलक्षण खरा !**—कॅलिफोर्निआंतील रोझव्हिल नांवाच्या गांवांतील एका फर्निचरच्या दुकानीं घरफोडी करून चोर शिरला. पण त्यानें कांहींहि चोरलें नाहीं. दुकानांतच असलेल्या स्वयंपाकघरांत त्यानें खाना बनवून भोजन केलें, मग दाढी केली व नंतर सुखसोयींनीं समृद्ध अशा झोपावयाच्या खोलींत ताणून दिली. इतकें करून नंतर स्वारी पसार झाली.

**पाकिस्तानांत कार्डबोर्डचा कारखाना**—पाकिस्तानांत गुजरानवाला येथें कार्डबोर्डचा कारखाना उभारण्याचें काम चालू आहे. कारखान्याचें भांडवल १,००,००,००० रुपये आहे. १९५५ च्या प्रारंभीं कारखाना मालाच्या उत्पादनास प्रारंभ करील, असा अंदाज आहे. पंजाबचें सरकार १९५४ मध्यें सायकलींचा कारखाना काढण्याविषयीं उद्योगपतींशी चर्चा करीत आहे, असें समजतें.

**भारताचें सायकलींचें उत्पादन**—भारतामधील सायकलींचें उत्पादन गेल्या दोन वर्षांत ९० टक्क्यानें वाढलें आहे. १९५०-५१ सालीं भारतात फक्त दोन कारखाने होते. त्यांनीं १९५० सालीं १,०३,१५३ सायकली व १९५१ सालीं १,१४,२७५ सायकली तयार केल्या. सध्यां भारतांत ६ कारखाने असून त्यांचें गेल्या वर्षीचें उत्पादन १,९६,९५९ सायकली झालें. सायकलींची आयात घटत चालली आहे. चालू सालीं अवघ्या ७२,००० सायकली आयात करण्यांत आल्या.

**मध्यभारतांत कालिदास-दिन**—मध्य-भारत सरकारनें ता. १४ नोव्हेंबर, १९५३ हा दिवस कविकुलगुरु कालिदास ह्यांचा स्मरण-दिन म्हणून साजरा करण्याचें ठरविलें आहे. कालिदासाचें चरित्र व कार्य ह्या नांवाचा एक ग्रंथ त्या दिवशीं प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. श्री. सूर्यनारायण व्यास हे इतिहासकार ग्रंथ लिहिणार आहेत.

**विजेच्या कारखान्याचा पुरवठा**—ब्रिटनमधील ब्रश ह्या विजेच्या कारखानदारी गटानें रशिआला एक संपूर्ण विजेचा कारखाना पुरविण्याचें काम मिळविलें आहे. सर्व यंत्रसामुग्री दोन वर्षांत पुरवावयाची आहे. कारखान्याच्या साहित्याची किंमत ३०,००,००० पौंड होईल. मात्र तें धाडण्यासाठीं निर्यातीचा परवाना द्यावा लागेल.

**आतां कातडीचीहि बँक !**—बर्मिंगहॅम विद्यापीठांतील शास्त्रज्ञांनीं मनुष्याच्या कातडीचा साठा करून त्यांचा गरजे-प्रमाणें उपयोग करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. अशीं रक्षण केलेलीं कातडीं प्राण्यांच्या अंगावर चिटकविण्यांत त्यांना यश मिळालें आहे. अजून माणसावर मात्र प्रयोग करून पहाण्यांत आलेला नाहीं.

**वाचकांनींच टाईप पसंत केला**—अमेरिकेच्या ओहिओ संस्थानांतील एका वृत्तपत्राच्या चालकांनीं वृत्तपत्रासाठीं नवा टाईप वापरण्याचें ठरविलें. निरनिराळ्या प्रकारच्या टाइपाचे नमुने एका पत्रकावर छापून पत्रकें वाचकांच्या पसंतीसाठीं त्यांच्याकडे धाडण्यांत आलीं. वाचकांकडून पसंत करण्यांत आलेला टाईपच संचालकांनीं वापरण्यास सुरवात केली.

## विडीच्या धंद्याचें यंत्रीकरण व त्याचे परिणाम

विडी तयार करावयाचा धंदा हा दिसावयास फारच किरकोळ धंदा असला तरी भारतांतील हा एक फारच मोठा उद्योगधंदा आहे. हा धंदा सर्व भारतामध्यें विखुरलेला असून तो खेड्यांमध्यें तसेंच शहरांमध्येंहि चालू आहे. हा एक ग्रामीण व छोट्या प्रमाणांत चालणारा धंदा आहे इतकेंच नव्हे तर हा संपूर्णपणें हस्तव्यवसायावर आधारला आहे.

**उत्पादन**—भारतामधील एकूण उत्पादनापैकीं शें. ८३ उत्पादन हें मध्यप्रदेश, मद्रास, मुंबई, प. बंगाल आणि बिहार या पांच राज्यांत होत असतें. एक पौंड विडीच्या बंडलांत अंदाजी १५०० तयार विड्या भरतात. विडीचें भारतांतील दैनिक उत्पादन सुमारें ५० कोट विड्यांपर्यंत आहे.

**मजूरवर्ग**—या धंद्यामध्यें वर्षभर काम करणाऱ्या मजुरांची संख्या ६ लाखांहून जास्त असून वर्षांतून २–३ महिने हंगामी काम करणाऱ्या मजुरांची संख्या ३ लाखांहून जास्त आहे. निरनिराळ्या राज्यांत काम करणाऱ्या विडी कामगारांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल.

| | | |
|---|---|---|
| १. मध्यप्रदेश ... | ... १,५०,००० | कामगार. |
| २. मुंबई ... | ... १,३२,००० | " |
| ३. मद्रास ... | ... ९६,००० | " |
| ४. पश्चिम बंगाल ... | ७२,००० | " |
| ५. बिहार ... | ... ४८,००० | " |
| ६. भारतांतील इतर प्रांत | १,०२,००० | " |

एका कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमींत कमी ५ ते १० अशी असते. शहरांमधील कारखान्यामध्यें ही संख्या जास्त असते. भारतांतील मोठ्यांत मोठा कारखाना मध्य भारतामध्यें असून या एका कारखान्यांत मजुरांची संख्या २५,००० इतकी आहे.

**भांडवल**—शेतकऱ्यांना हा एक उत्तम जोडधंदा असून भारतामध्यें या धंद्यांत ६० कोटींपेक्षा जास्त भांडवल गुंतलेलें आहे. पैकीं सुमारें २०० कारखानदार हे वरील भांडवलापैकीं ७५ टक्के भांडवलाचे मालक आहेत. यावरून असें दिसून येतें कीं, या उद्योगधंद्यापासून होणाऱ्या फायद्याचा बराच मोठा वांटा मजुरांच्या वांट्याला न जातां तो कारखानदारांच्या वांट्याला जातो.

तंबाखूवरील कर रूपानें भारत सरकारला वार्षिक ११ कोट रुपयांहून जास्त उत्पन्न दरसाल मिळत असतें.

### विड्या तयार करण्याचे यंत्राचा शोध

विडी तयार करण्याच्या यंत्राचा शोध लागला असून दोन यंत्रें तयार झालीं आहेत. त्यांपैकीं एक मुंबई येथें असून दुसरें बनारस येथें आहे. या यंत्रावर एका दिवसांत १० हजार ते १५ हजारांपर्यंत विड्या तयार होऊं शकतात. म्हणजेच, हें यंत्र एका दिवसांत एका मजुराचे सुमारें १२ पट काम करूं शकतें. यंत्रामध्यें थोड्याशा तांत्रिक सुधारणा करून त्याची उत्पादनशक्ति दुप्पट होऊं शकेल असें तज्ज्ञांचें मत आहे. भारतांतील कांहीं उद्योगपतींचा या धंद्याचें यंत्रीकरण करण्याचा विचार आहे आणि म्हणूनच या यंत्रीकरणापासून होणाऱ्या परिणामाचा विचार करणें आवश्यक झालें आहे.

### यंत्रीकरणाचे परिणाम

[ १ ] वर नमूद केल्याप्रमाणें भारतांत दररोज ५० कोट विड्या तयार होतात. हें विडी करण्याचें काम यंत्राच्या साहाय्यानें सुरू केल्यास फक्त ७५ हजार मजूर पुरे आहेत. म्हणजे सध्या या धंद्यावर अवलंबून असणाऱ्या ६ लाख मजुरांपैकीं ५ लाख २५ हजार बेकारीच्या खाईत लोटले जातील.

[ २ ] शेतकऱ्यांना विडीच्या धंद्याचा जोडधंदा म्हणून उपयोग करतां येणार नाहीं व खेडेगांवांची वस्ती कमी होऊन ती शहरांत वाढली जाईल.

[ ३ ] पंचवार्षिक योजनेप्रमाणें सरकारनें ७०० कोटी रुपये ४ लाख मजुरांना उद्योगधंद्यामध्यें काम देण्याकरितां खर्च करण्याचें ठरविलें आहे. त्यामध्यें या धंद्यापासून बेकार होणाऱ्या ५ लाख लोकांची जादा भर पडणार आहे.

### यंत्रीकरणाच्या बाजूचें लंगडें समर्थन

विडी धंद्याचें यंत्रीकरण करावें असें म्हणणारे लोक म्हणतात कीं, यंत्रीकरणामुळें गिऱ्हाईकांना स्वस्त भावांत विडी पुरवितां येईल. हें म्हणणें बरोबर असलें तरी या धंद्यांतील नफ्याचा मोठा वांटा ग्राहकांना मिळणार नसून तो भांडवलदारांनाच मिळणार आहे. ग्राहकांच्या दृष्टीनें सर्वसाधारणरीत्या वार्षिक बचत फक्त १ रु. १२ आणे पर्यंतच प्रत्येकीं होऊं शकते. परंतु ह्या १ रु. १२ आण्यांच्या लोभानें भारतांतील सुमारें ५ लाख लोकांना बेकार व्हावें लागणार आहे. हल्लीं बेकारीचें भूत सर्व भारतांत थैमान घालीत असतांना त्यास कसें तोंड द्यावें, असा बिकट प्रश्न राष्ट्रीय पुढाऱ्यांपुढें असतांना या धंद्यांतील गुंतलेल्या आणखी ५ लाख लोकांना बेकार करावें असें कोणीहि समंजस माणूस म्हणणार नाहीं.

वरील विवेचनावरून भारतामध्यें हा छोटा दिसणारा धंदा किती महत्त्वाचा आहे याची कल्पना आपणांस येईल व या धंद्याचें यंत्रीकरण केल्यास त्यापासून होणाऱ्या परिणामाचीहि थोडीशी रूपरेषा आम्हीं वाचकांच्या पुढें मांडली आहे. तरी समाजसुधारक आणि जनता या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करून सरकारला योग्य तें मार्गदर्शन करील अशी आम्हांस दृढ आशा आहे.

( व्यापारी-मित्र, ऑगस्ट, १९५३ )


पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री–संघ लि.,

१२५ भवानी पेठ, पुणें. २.

**( फक्त सभासदांकरतां )**

## नोटीस

पुणें जिल्हा सहकारी खरेदी–विक्री–संघ लि. ची वार्षिक साधारण सभा दि. २०–९–५३ ( रविवार ) रोजीं दुपारीं ३ वाजतां संघाच्या कार्यालयांत ( १२५ भवानी पेठ, पुणें. ) बोलाविली आहे. सभेंत खालीलप्रमाणें कामें करण्यांत येतील.

सभेपुढील विषयः–( १ ) दि. ३०–६–५३ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वृत्तांत, ताळेबंदपत्रकें, नफा वांटणी व वसूल मागांवर डिव्हिडंड मंजूर करणें. (२) मे. स्पेशल ऑडिटर साहेब, (को. ऑ. सोसायटीज्) यांच्या दि. ३०–६–५२ अखेरील तपासणी यादीची आणि स्थानिक हिशेब तपासनीस यांच्या दि. ३०-६-५३ अखेरील तपासणी यादीची नोंद घेणें. ( ३ ) कार्यकारी मंडळावरील ज्या जागांकरतां नॉमिनेशन पेपर्स नाहींत अशा जागीं, निवडणूक नियम नं. १९ अन्वयें सभासदांची निवड करणें. (४) सन १९५३–५४ सालाकरतां निवडून आलेल्या कार्यकारी मंडळावरील सभासदांचीं नांवें जाहीर करणें. ( ५ ) सन १९५३–५४ सालाकरतां निवडून आलेल्या स्थानिक हिशेबतपासनीसांचीं नांवें जाहीर करणें. (६) पोट नियम नं. ४२ (३४), ३७ (अ) व निवडणूक नियम नं ५०,५१ ( अ ) मधील दुरुस्त्यांचा विचार करणें. (७) मे. अध्यक्षांच्या परवानगीनें ऐन वेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें. संघाच्या सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंती आहे.

मे. कार्यकारी मंडळाच्या हुकुमावरून

पुणें
दि. २७ ऑगस्ट १९५३

ना. कृ. कुलकर्णी.
मॅनेजर
पुणें जिल्हा सहकारी–खरेदी विक्री संघ लि.,

# अर्थ

बुधवार, ता. १६ सप्टेंबर १९५१





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## "स्वतंत्र भारताची पहिली पंचवार्षिक योजना"

### सामान्य नागरिकाच्या उपयोगाची, श्री. भा. म. काळे ह्यांची पुस्तिका*

"अर्था"चे एक विद्वान् लेखक, श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी., ह्यांनीं पंचवार्षिक योजनेचें स्वरूप समजावून सांगणारी प्रस्तुत पुस्तिका लिहिलेली आहे. तिचा उद्देश, हायस्कुलांतील शेवटच्या वर्षाचे विद्यार्थी व आर्टस कॉलेजांतील पहिल्या वर्षाचे विद्यार्थी ह्यांना पंचवार्षिक योजनेच्या दुरुस्त आराखड्याची तोंडओळख नीटपणें करून देणें, हा आहे. प्राथमिक ट्रेनिंग संस्थांतील विद्यार्थ्यांनाहि पुस्तिका उपयुक्त होईल; त्याचप्रमाणें सामान्य वाचकासाहि ती बोधप्रद होईल. सध्यांच्या आर्थिक प्रश्नांचें स्वरूप व ते प्रश्न सोडविण्याचे नियोजित प्रयत्न, ह्यांची माहिती पुस्तिकेच्या वाचनानें सहज होऊं शकेल, अशी त्याची मांडणी केलेली आहे. नियोजन म्हणजे काय, येथपासून प्रारंभ करून पंचवार्षिक योजनेबद्दल जनतेची जबाबदारीची कल्पना आणून देईपर्यंतच्या सर्व प्रकरणांत केलेलें विवेचन अत्यंत सोपें व चटकन् समजूं शकेल असेंच आहे. श्री. काळे ह्यांचा आर्थिक प्रश्न समजावून सांगण्याच्या बाबतींत हातखंडा आहे. त्याचबरोबर त्यांच्या लेखनाचा पाया शास्त्रशुद्ध व अद्यावत माहितीचा असतो. प्रस्तुत पुस्तिका योग्य वेळीं प्रसिद्ध करून त्यांनीं जिज्ञासूंची उत्कृष्ट सेवा केली आहे. भारताची पंचवार्षिक योजना हा पहिला पाया आहे व ह्या पायावर आणखी योजना आधारल्या जावयाच्या असून एका पिढीच्या काळांतच दरमाणशीं सरासरी उत्पन्न दुप्पट होऊन जीवनविषयक परिस्थिति बरीच सुधारेल, अशी अपेक्षा आहे. सुरवातीची योजना यशस्वी झाली तरच जनतेचा उत्साह टिकेल व वाढीस लागेल, ह्या दृष्टीनें ह्या योजनेकडे पाहिले पाहिजे. पंचवार्षिक योजनेबद्दल आपुलकी निर्माण होण्याचें अगत्य श्री. काळे ह्यांनीं प्रतिपादलें आहे व हिंदी आर्थिक दुःस्थितीच्या पार्श्वभूमीवरून पाहिलें असतां, योजना कितीहि मर्यादित असली, तरी ती वास्तववादीच आहे, असें आग्रहपूर्वक सांगितलें आहे.

### योजनेचा वास्तववादीपणा

"पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम यशस्वी करण्याचे प्रयत्न सरकारकडून चालू आहेतच. परंतु हा सर्व कार्यक्रम असा आहे कीं, त्याला समाजांतील सर्वांचा पाठिंबा व पूर्ण सहकार्य पाहिजे. योजनेच्या विविध बाजूंपैकी कोणत्यातरी एकदोन किंवा जास्त गोष्टींशीं समाजांतील प्रत्येकाचा संबंध येत आहे. धान्योत्पादनाच्या कार्यासाठीं शेतकऱ्याचा निकट संबंध येतो, तर कारखानदारांचा संबंध औद्योगिक उत्पादनाशीं येतो. मध्यमवर्गीय सामान्य जनतेचा संबंध योजनेसाठी 'बचत-योजना' किंवा 'सरकारी कर्जउभारणी' या गोष्टींशीं येतो. कुटुंब-नियोजनाशीं तर बहुतेक सर्व प्रौढांचा संबंध येत आहे. शाळा-कॉलेजांतील तरुण विद्यार्थ्यांकडून सुटीच्या वेळांत खेडेगांवांतून श्रमांची अपेक्षा आहे. बैठे उद्योग करणाऱ्यांवरहि आपापल्या धंद्याचें उत्पादन वाढविण्याची जबाबदारी आहे. पंचवार्षिक योजनेचें कार्य सर्वांचेंच असल्यामुळें या कार्याबद्दल सर्वसामान्य जनतेमध्यें उत्साह व आपलेपणा निर्माण झाला पाहिजे. जनतेनें या कार्यक्रमाशीं समरस किंवा एकजीव झालें पाहिजे. कार्यक्रमाच्या यशासाठी सहकारी तत्त्वाचा शक्य तितका परिस्थित्यनुरूप उपयोग केला पाहिजे. सामान्य नागरिकाला या योजनेबद्दल पूर्ण माहिती असली पाहिजे. वृत्तपत्रांतून अशी माहिती वारंवार प्रसिद्ध होतेच. सामान्य वाचकाच्या दृष्टीनें अगदीं थोडक्यांत पंचवार्षिक योजनेचें स्वरूप, आतांपर्यंत झालेल्या कार्याचा आढावा, व योजनेच्या यशासाठी आपणावर पडणारी जबाबदारी याबद्दल माहिती या लहानशा पुस्तकांत योग्य समजूत होईल अशा तऱ्हेनें देणें हा उद्देश आहे.

"पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाला यश यावयाचें असल्यास, त्याबद्दल जनतेनें उत्साह व आपलेपणा दाखविला पाहिजे. ज्याप्रमाणें आपलें स्वतःचें घर दुरुस्त करावयाचें असल्यास त्याबद्दल आपण आपुलकीनें काळजी घेतो व काम करण्यांत दक्षता बाळगतों, त्याचप्रमाणें पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम हा आपणां सर्वांसाठीं आहे असें समजून, त्याबद्दल आपुलकी व उत्साह दाखविला पाहिजे. एखाद्या गांवामध्यें सार्वजनिक स्वरूपाचा उत्सव असला म्हणजे सर्व लोक साधारणपणें जसें त्या उत्सवाच्या कार्यांत लक्ष घालतात व पडेल तें काम आनंदानें करतात, त्याप्रमाणें पंचवार्षिक योजनेच्या बाबतींत आपण सर्वांनीं शक्य असेल त्या बाबतींत औत्सुक्य दाखविलें पाहिजे. अशा तऱ्हेचा आपलेपणा निर्माण झाला, तरच पंचवार्षिक योजना यशस्वी होण्याला मदत होईल.

"प्रथम या योजनेविषयीं कांहीं गैरसमज असल्यास तो दूर केला पाहिजे. कोणत्याहि बाबतींत टीका करणें फार सोपें असतें; परंतु विधायक कार्य करणें मात्र अवघड असतें. कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट, भांडवलदार इत्यादि अनेक, योजनेबद्दल टीका करूं शकतात हें खरें आहे. टीका करणारांचीं मनेंहि शुद्ध असतील. परंतु प्रथमच एक गोष्ट आपण लक्षांत ठेवावी कीं, आपला देश ब्रिटिश अमदानींत दारिद्र्यानें इतका पोखरून गेला आहे कीं, कोणतेंहि कार्य करावयासाठीं आपणांला नेहमीं पैशांची अडचण भासते. नंतर हीहि गोष्ट आपण लक्षांत ठेवावी कीं, उद्योगधंद्यांच्या बाबतींत आपलें उत्पादनसामर्थ्य इतर प्रगतीपर देशांच्या मानानें फारच कमी आहे व तें भांडवलाशिवाय आणि तांत्रिक व यांत्रिक ज्ञानाशिवाय वाढवितां येणार नाहीं. मूलभूत किंवा आधारभूत उद्योगधंद्यांच्या बाबतींत फारच थोडी प्रगति झाली आहे. ज्या पद्धतीनें गेल्या एका वर्षांत कापड व साखर यांचें उत्पादन वाढलें आहे, त्याबद्दल अभिमान बाळगण्यासारखें कांहींच नाहीं. शेतीच्या उत्पादनाच्या बाबतींत आपणांला निसर्गाच्या कृपेवर अवलंबून

* लेखकः—भा. म. काळे, एम्. ए., बी. टी. प्रकाशकः—बापट आणि कं., मुंबई ४. पृ. सं. ८०. किंमत १२ आ.

रहावें लागतें, व या बाबतींत अडचणी दूर करण्यासाठी पाणी-पुरवठ्याच्या मोठाल्या योजना, कीं, ज्यांचे अंदाज आज तयार आहेत किंवा ज्या सुरू झाल्या आहेत, पूर्ण करावयाच्या तर निदान रु. १२०० कोटी पाहिजेत. जनतेची परिस्थिति इतकी खालावलेली आहे कीं, जनतेकडून नवीन करांच्या रूपानें, किंवा बचतीच्या स्वरूपांत, किंवा कर्जउभारणीला मदत करून, मोठ्या प्रमाणांत पैसा उभारला जाणें अशक्य आहे. आज प्राप्तीवरील कर भरणारांची संख्या फार तर ४ लक्ष ७० हजार म्हणजे शेंकडा ०·१४ इतकी कमी आहे. यावरून आर्थिकदृष्ट्या सामान्य जनता किती मागासलेली आहे याची कल्पना करतां येईल. अशा अडचणींच्या परिस्थितींत रचनात्मक कार्यक्रमाची एखादी योजना यशस्वी करणें फार कठीण आहे. यावरून सरकारच्या मार्गांत अडचणी किती आहेत याची कल्पना येईल. पहिली पंचवार्षिक योजना एकदम डोळ्यांत भरण्यासारखी नाहीं याचेंहि कारण हेंच. योजनेसाठीं पैसा उभारणें फार कठीण असल्यामुळें शक्य तितकी माफक खर्चाची योजना तयार करण्यांत आली आहे. या योजनेसाठीं लागणाऱ्या रु. २०६९ कोटी पैशांपैकी एक-चतुर्थांश पैसा परदेशांकडून मदतीच्या रूपानें स्वीकारावा लागणार आहे व सुमारें एक-सप्तमांश पैसा सरकार नोटा छापवून भागविणार आहे. यावरून पैसा उभारण्याच्या बाबतींत अडचणी किती तीव्र स्वरूपाच्या आहेत, हें लक्षांत येईल. अशा प्रकारच्या अडचणींना तोंड देऊन तयार करण्यांत आलेली ही योजना वास्तववादी असून व्यावहारिक स्वरूपाची आहे, असें कबूल केलें पाहिजे. १९५६ मध्यें आपणाला दुसऱ्या महायुद्धापूर्वीची जीवनविषयक पातळी गांठतां येणार आहे. परंतु योजनेच्या काळांतच १९५६ पर्यंत रु. ११९९ कोटींच्या भांडवली खर्चानें मध्य व राज्य सरकारांचें उत्पादन-सामर्थ्य कायमचें वाढणार आहे. ग्रामीण विकास-योजना यशस्वी झाल्यास, पुष्कळशा खेडेगांवांतून जीवनविषयक बऱ्याच सुधारणा होणार आहेत. अन्न-धान्य व बहुतेक सर्व कारखानी माल (यंत्रसामुग्री सोडून) यांच्या बाबतींत आपण आपल्या गरजा भागवूं शकूं, एवढेंच नव्हें, तर कांहीं कारखानी माल आपण परदेशांकडेहि निर्गत करूं शकूं. रचनात्मक कार्यक्रमाच्या दृष्टीनें पोषक वातावरण निर्माण करणें हाहि योजनेचा एक उद्देश दिसतो. आणखी एक गोष्ट म्हणजे १९५६ नंतर चार पंचवार्षिक योजना अंमलांत आणल्या जातील व शेवटीं १९७६ मध्यें हिंदचें वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न १९५१च्या दुप्पट होईल, असा अंदाज आहे. यामुळेंच ही पहिली पंचवार्षिक योजना वास्तववादी आहे, असें म्हणणें योग्य होईल.

" ही योजना काँग्रेसपक्ष अधिकारारूढ असतांना तयार झाली असली, तरी देशांतील सर्व पक्षांच्या लोकांची विचारसरणी नियोजन-मंडळानें विचारांत घेतली आहे. नियोजन मंडळाचा दृष्टिकोन असा आहे कीं, ही योजना सर्व देशासाठीं आहे असें समजून प्रत्येकानें ती यशस्वी करण्याचा प्रयत्न करावा. " असें आवाहन श्री. काळे ह्यांनीं केलें आहे.

---

**उत्तर प्रदेशांतील कापडाचें उत्पादन**—उत्तर प्रदेशांतील कापडाच्या गिरण्यांनीं १९५२-५३ सालीं ३४·२३ कोटी वार कापडाचें उत्पादन केलें. १९४८सालीं ३०·९३ कोटी वार कापड तयार झालें होतें. १९४८ सालीं मागांची संख्या ११,८४८ होती, ती १९५३ सालीं १२,७३३ झाली आहे. चात्यांची संख्या ६·४० लाख होती ती आतां ७·७९ लाख झाली आहे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. वी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

**स्थापना : १९४३**

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## अमेरिकन उद्योगधंद्यांतील लक्षावधि भागीदार

अमेरिकेंतील मोठमोठ्या व्यापारी कंपन्या एके काळीं कांहीं थोड्या श्रीमंत भांडवलदारांच्या मालकीच्या होत्या. आतां त्या कंपन्यांत लक्षावधि भागीदार आहेत. "अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनी." ही एकच कंपनी सुमारें १२,५०,००० व्यक्तींच्या मालकीची आहे.

व्यापारधंद्याच्या मालकीचें हें व्यापक विकेंद्रीकरण गेल्या ४० वर्षांत घडून आलें आहे. अमेरिकेंतील विकासशील अर्थकारणाच्या अनेक अंगांपैकी एक अंग या विकेन्द्रित मालकींत दिसून येतें. अमेरिकेंतील अधिकाधिक लोक उत्पादनांत भाग घेत आहेत, उपभोग्य मालाची खरेदी करीत आहेत, उद्योगधंद्यांत पैसे गुंतवीत आहेत आणि देशाच्या साधनसंपत्तीचे मालक होत आहेत.

सुमारें ४० वर्षांपूर्वी कांहीं अतिशय मोठ्या व्यापारी संघटनांनीं सर्वसामान्य जनतेंत शेअर विकण्यास सुरुवात केली आणि त्यामुळें उद्योगधंद्यांच्या मालकीचें विकेंद्रीकरण होऊं लागलें. सट्टयांत किंवा जुगारींत प्रचंड फायदा—आणि बहुधा फार मोठा तोटा—होण्याचा संभव असतो. पण त्या शेअरविक्रींत असा संभव मुळींच नव्हता. त्या शेअरमध्यें पैसे गुंतविणाऱ्यांना धोका नव्हता आणि नफा थोडा मिळाला तरी नफ्याची अनिश्चिति नव्हती.

अशा रीतीनें, भांडवल गुंतविणाऱ्यांचा एक नवीन वर्ग तयार झाला. रोजगार व पगार मिळविण्यासाठी कष्ट करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा त्या वर्गांत भरणा होता. त्यांची प्राप्ति मर्यादित होती. प्राप्तीचा कांहीं भाग शिल्लक टाकून आणि शिल्लकींतील कांहीं भाग शेअरच्या खरेदीसाठी खर्चून त्या स्त्री-पुरुषांनीं उद्योगधंद्यांत पैसे गुंतविले आणि उद्योगधंद्यांची मालकी अंशतः आपल्याकडे घेतली.

कालांतरानें मालकीचा विस्तार वाढत गेला आणि सर्व प्रकारच्या अमेरिकन उद्योगधंद्यांतील भांडवलाचें स्वरूप पुष्कळच बदललें. पूर्वी जें भांडवल बँकांकडून कर्जाऊ घेतलें जात असे त्यापैकीं बरेंचसें भांडवल आतां भागीदार व्यक्तींकडून प्रत्यक्षपणें स्टॉकच्या रूपानें जमविलें जाऊं लागलें. दर वर्षी कंपन्यांना जो नफा होतो तो सर्वच त्या भागीदारांत वाटीत नाहींत. नफ्याचा कांहीं भाग राखीव भांडवल म्हणून धंद्याच्या विकासासाठी त्या राखून ठेवतात. भागीदाराला त्याच्या पैशांवर दरसाल साधारणपणें ५ टक्के नफा ( डिव्हिडंड ) मिळतो आणि कंपनीचें राखीव भांडवल ज्या प्रमाणांत वाढेल त्या प्रमाणांत त्याच्या भागाची किंमतहि वाढत जाते.

राष्ट्रांतील खाजगी भांडवलाच्या मालकींत व नफ्यांत लोकसमुदायाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हिस्सा असल्यामुळें उद्योगधंदे सार्वजनिक हिताच्याच दृष्टीनें चालवावे लागतात. कांहीं मूठभर व्यक्तींच्या हितासाठी उद्योगधंदे चालवितां येत नाहींत.

वॉशिंग्टन येथील "ब्रूकिंग्ज इन्स्टिट्यूशन" नांवाच्या एका खाजगी संशोधन संस्थेनें नुकत्याच केलेल्या निरीक्षणावरून असें दिसून येतें कीं, अमेरिकेंतील व्यापारी संघटनांत सुमारें ९५,००,००० व्यक्ती भागीदार आहेत. आणखी लक्षावधि लोक असंघटित व्यापारी कंपन्यांचे अंशतः मालक आहेत. याचा अर्थ असा कीं, अमेरिकेंतील सुमारें प्रत्येक चारापैकीं एका कुटुंबाचे हितसंबंध कोणत्या तरी औद्योगिक किंवा व्यापारी उपक्रमांत गुंतलेले असतात.

आणखी दुसऱ्या एका पद्धतीनें कित्येक अमेरिकन लोकांकडे व्यापारी संस्थांची मालकी अप्रत्यक्षपणें आलेली असते. विमा उतरविल्यानें हे हितसंबंध निर्माण होत असतात. विमेदारांचे पैसे देतां यावेत म्हणून विमा कंपन्या प्रचंड गंगाजळी राखून ठेवीत असतात. हें राखीव भांडवल कर्जरोख्यांत, तारणांत, स्टॉकमध्यें आणि इतर विविध प्रकारच्या व्यापारी उपक्रमांत गुंतविलेलें असतें. सहकारी विमा कंपनींत विमेदार हेच कंपनीचे मालक असतात आणि म्हणून त्यांना कंपनीच्या भांडवलावरील नफ्यांत हिस्सा मिळतो.

न्यूयॉर्कच्या "मेट्रोपॉलिटन लाइफ इन्शुरन्स कंपनी" चें १० अब्ज डॉलर भांडवल असून ३ कोटी, ३० लक्ष विमेदार त्या कंपनीचे मालक आहेत. म्हणजे, ३ कोटी ३० लक्ष विमेदार व्यक्तींपैकीं प्रत्येक व्यक्ति अमेरिकन उद्योगधंद्यांची अप्रत्यक्ष मालक आहे.

उद्योगधंद्यांच्या नफ्यांत ज्यांचा अप्रत्यक्ष हिस्सा आहे अशा अमेरिकन विमेदारांची संख्या अंदाजें ८ कोटी, ५० लक्ष आहे.

जनतेचें सहकार्य मिळविण्यासाठी अमेरिकेंतील व्यापारी संघटना अनेक प्रकारें प्रयत्न करीत असतात. अलीकडे मोठमोठ्या व्यापारी संघटनांकडून भागीदारांकडे जमाखर्चाचा वार्षिक आढावा पाठविला जातो. त्यासोबत सुबोध स्पष्टीकरणहि पाठविलें जात असल्यामुळें सामान्य माणसालाहि त्या आर्थिक बाबी सहज समजतात. त्याशिवाय कंपनीचीं कार्यें स्पष्ट करण्यासाठी भागीदारांकडे नियतकालिक अहवाल पाठविले जातात.

व्यापारी क्षेत्रांत भांडवल गुंतविण्याची ही जी प्रवृत्ति सामान्य लोकांत वाढत गेली तिचें एक उल्लेखनीय वैशिष्टय हें आहे कीं ही प्रवृत्ति स्वयंप्रेरणेनेंच वाढली आहे. भागीदारांच्या हक्कांचें संरक्षण करण्यासाठी आणि लबाडी—अफरातफरीपासून त्यांना वाचविण्यासाठी सरकारनें यांत जरूर तेवढाच संबंध ठेवला आहे.

---

## आसामसाठी स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन

आसाम राज्याचे अर्थमंत्री श्री. मोतीराम बोरा ह्यांनीं विधानसभेंत राज्यासाठी स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा ठराव मांडला आणि तो मंजूरहि झाला. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल २ कोटी रुपयांचें रहाणार असून वसूल भांडवल १ कोटी रुपयांचें राहील. मध्यवर्ती सरकारच्या अनुमतीनें भांडवलाचे १०० रुपयांचे भाग करण्यांत आले आहेत. भाग-भांडवलाची वांटणी पुढीलप्रमाणें करण्यांत येणार असल्याचें समजतें. आसाम सरकार २५ लाख; रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ २० लाख; शेड्यूल्ड बँका, विमा कंपन्या, इंव्हेस्टमेंट ट्रस्टस्, को-ऑपरेटिव्ह बँका व इतर द्रव्यविषयक संस्था मिळून ३० लाख आणि इतर २५ लाख. ठरावावर बोलतांना श्री. बोरा म्हणाले कीं, राज्यांतील सध्यांच्या कारखान्यांचा विस्तार घडवून आणण्यासाठीं अशा प्रकारच्या कॉर्पोरेशनची जरूर आहे. कॉर्पोरेशनचें कार्यक्षेत्र खाजगी मालकीच्या संस्थांना मदत करण्यापुरतेंच मर्यादित रहाणार आहे. आसाममधील खादी आणि ग्रामोद्योगांना साह्य करण्यासाठींहि एक बोर्ड स्थापन करण्याचा ठराव विधान सभेनें मंजूर केला आहे. ह्या बोर्डाचें अध्यक्षपद आसामचे ग्रामोद्योगमंत्री श्री. चौधरी ह्यांच्याकडे रहाणार आहे. इतर कांहीं राज्यांच्या मानानें आसाम राज्य उद्योगधंद्यांत मागासलेलें आहे. तेथील उद्योगधंद्यांना त्यांच्या बाल्यावस्थेंत आर्थिक साह्य करण्याची जरूरी उघडच आहे. राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारच्या सल्ला-मसलतीनें जरूर ती उपाय-योजना केलीच केल्यामुळें आसाममधील उद्योगधंद्यांचे पाऊल पुढें पडण्यास निःसंशय मदत होईल.

## रिझर्व्ह बँकेचा १९५२–५३ सालचा अहवाल

रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाचा १९ वा वार्षिक अहवाल रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टाच्या ५३ (२) कलमान्वयें भारत सरकारला सादर करण्यांत आला असून, ३० जून १९५३ ला संपलेल्या वर्षांतील देशाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतांना त्यांत पुढील मुद्दे मांडलेले आहेत:—

(अ) भारतीय अर्थव्यवस्थेस १९५२ च्या सुरवातीच्या काळांत धोका उत्पन्न करणाऱ्या संभाव्य मंदीस थोपवून धरण्यासाठी भारत सरकारनें वेळींच केलेल्या उपाययोजनांचा उपयोग झाला व त्यामुळें विश्वास पुन्हां निर्माण होण्यास, तसेंच किंमतींतील तौलनिक स्थैर्य टिकविण्यास मदत झाली.

(आ) डिसेंबर १९५२ पासून किंमतींत झालेल्या वाढीचीं कारणें अजून स्पष्ट नाहींत. या वाढीस कारणीभूत होणाऱ्या बाबींसंबंधीं निष्कर्ष काढण्याइतकी माहिती सध्यां उपलब्ध नाहीं.

(इ) खाजगी आणि सरकारी आयातींत एकदम घट झाल्यानें जुलै, १९५२ ते जून, १९५३ या मुदतींत भारताची देण्याघेण्याची परिस्थिति अनुकूल राहण्याचा संभव आहे. ब्रिटिश सरकार बरोबरच्या करारानुसार या कालावधसाठीं उपलब्ध असलेल्या ३·५ कोटी पौंड गंगाजळींतून उचल करण्याची भारताला गरज लागली नाहीं.

(ई) पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत खाजगी उद्योगांत किती भांडवल गुंतलें गेलें याची पुरेशी माहिती नसल्यानें त्याचें संख्यात्मक मूल्यमापन करणें सध्यां शक्य होत नाहीं. व्याजाचे भारी दर अस्तित्वांत असले आणि सरकारी खर्चामुळें अधिक प्राप्ति झाल्यानें खाजगी बचतीस चालना मिळण्याचा संभव असला तरी आतां त्यामुळें किती गुंतवणूक होऊं शकेल याचा अंदाज करणें अवघड आहे.

या वर्षांतील बँकेच्या कामांचा पुढील चार सदराखाली घेतलेला आढावा हें या अहवालाचें आणखी एक महत्त्वाचें वैशिष्ट्य आहे.

(१) भक्कम बँकिंग पद्धतीची वाढ होण्यासाठीं केलेल्या उपाययोजना.

(२) रिझर्व्ह बँकेनें व्यापारी बँकांना दिलेल्या सवलती.

(३) देशांत, विशेषतः ग्रामीण विभागांत, बँकिंगविषयक सवलती वाढविण्यासाठीं योजलेले उपाय.

(४) बँका आणि सहकारी संस्था यांच्या नोकरांसाठीं केलेली शिक्षणाची तरतूद. अहवालाच्या शेवटीं बँकेचें वार्षिक हिशोबपत्रक दिलें आहे, या वर्षांतील बँकेचें उत्पन्न १६·४७ कोटी रुपये व खर्च ३·९७ कोटी रुपये आहे. म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टाच्या ४७ व्या कलमान्वयें भारत सरकारला निव्वळ नफा म्हणून १२·५० कोटी रुपये मिळतील. गेल्या वर्षी हीच रकम ७·५० कोटी रु. होती.

---

**हौशी प्रवाशांची सोय**—परदेशाहून भारताला येणाऱ्या हौशी प्रवाशांना जरूर ती माहिती पुरविण्यासाठी भारत सरकारनें बनारस येथें एक कचेरी उघडली आहे. कचेरीचें उद्घाटन करतांना उत्तर प्रदेशाचे गृहमंत्री डॉ. संपूर्णानंद ह्यांनीं शहरांतील लोकांनीं कचेरीशीं सहकार्य करावें अशी विनंती केली.

**निर्वासितांसाठी दुकानें**—उत्तर-प्रदेशांतील निर्वासितांसाठी चालू आर्थिक वर्षीं आणखी १,६०० पक्कीं दुकानें लखनौ येथें बांधण्यांत येणार आहेत. ह्या वसाहत-योजनेसाठी २५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

---

### पूना बँकिंग असोसिएशनच्या बँकर्स वार्षिकाचा प्रकाशन-समारंभ

| दिवस वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|
| शनिवार १९-९-५३ सकाळीं ९–३० | श्री. बी. टी. ठाकूर, जनरल मॅनेजर, युनायटेड कमर्शिअल बँक लि. | बँकर व आधुनिक समाज. |
| रविवार २०-९-५३ सकाळीं ९–३० | श्री. डी. फ्रीमन (एक्स–ऑफिसर, लॉइड्स बँक लि.) फॉरिन एक्सचेंज डिपार्टमेंट, कॅनरा बँक लि. | शिपिंग व बँकिंग |

समारंभ-स्थळ: पुणें सेंट्रल को. बँकेचा दिवाणखाना, लक्ष्मी रोड, पुणें.

---


धी बॉम्बे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

## जाहीर खबर

जाहीर करण्यांत येते कीं, ह्या बँकेची ४२ वी वार्षिक साधारण सभा शनिवार, दिनांक २६ सप्टेंबर १९५३ रोजीं दुपारीं २ वाजतां (स्टॅं. टा.) बँकेच्या रजिस्टर्ड कचेरींत (विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९५३ रोजीं संपणाऱ्या वर्षाचें तपासलेले ताळेबंद नफातोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफा वाटणीचा दर जाहीर करणें.

३. संचालक मंडळाची निवड करणें.

४. हिशेब तपासनिसाची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

संचालक मंडळाच्या हुकुमावरून

मुंबई ११-९-१९५३ — व्ही. एम्. ठाकोर, जनरल मॅनेजर

भागांच्या तबदिलाचें काम (ट्रान्सफर बुकें) ता. १४–९–१९५३ ते २६–९–१९५३ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील. मंजूर झाल्यास डिव्हिडंडची रक्कम ता. ११-९-१९५३ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल झालेलीं असतील, त्यांना सोमवार ता. १२ ऑक्टोबर १९५३ पासून मुंबई ऑफिसमध्यें मिळेल.

---

श्रीलक्ष्मी सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. फलटण

## प्रकट सूचना

बँकेची सत्ताविसावी वार्षिक साधारण सभा बुधवार दि. ३० सप्टेंबर १९५३ या दिवशीं सायंकाळीं ५॥ वाजतां फलटण येथें बँकेच्या कचेरीमधील दिवाणखान्यांत भरणार आहे. सभेंत खालील कामें करण्यांत येतील:—

(१) दि. ३०–९–५२ च्या वार्षिक सभेचा वृत्तांत, (२) हिशेबतपासनीस यांची तपासणी यादी, (३) दि. ३०–६–१९५३ ला संपलेल्या वर्षाबद्दल प्रतिवृत्त, ताळेबंदपत्रकें व नफा वांटणी, (४) भागीदारांना वांटावयाचा नफा, (५) सोनें–चांदी व माल तारणाचें मंजूर होऊन आलेले नियम, (६) पुढील वर्षाकरितां बँकेचा हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचें वेतन, (७) चालू वर्षांत बँकेनें घ्यावयाची जबाबदारी, आणि (८) इतर व आयत्या वेळचीं कामें, यांचा विचार करणें.

सर्व भागीदारांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे.

फलटण, दि. १०–९–१९५३ — संचालक मंडळाच्या आज्ञेवरून श्री. ह. तळवलकर, व्यवस्थापक.

## अर्बन को. बँकांच्या प्रगतीचा आढावा

### सांगली येथील परिषदेंत अर्थमंत्री डॉ. जीवराज मेहता ह्यांचें भाषण

भारतांत फक्त मुंबई आणि मद्रास या दोनच राज्यांत अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकांची भरीव अशी प्रगति झाली आहे. मुंबई राज्यांत तर गेल्या कांहीं वर्षांत या चळवळीची डोळ्यांत भरण्यासारखी प्रगति झाली आहे. अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचा व्यवसाय म्हणजे अर्बन को–ऑपरेटिव्ह पतपेढीच्या कार्याचाच विस्तार असें म्हणतां येईल. ज्या अर्बन पतपेढ्या इंडियन कंपनीज् ॲक्टाच्या कलम २७७ (फ) मध्यें वर्णन केलेले बँकिंगचे व्यवहार करतील म्हणजे, चेक, ड्राफ्ट किंवा ऑर्डरनें काढतां येतात अशा ठेवी करंट अकौंटमध्यें किंवा इतर प्रकारें स्वीकारतील आणि ज्यांचें भरणा झालेलें शेअरभांडवल २०,००० रुपयांपेक्षा कमी नसेल, अशा पतपेढ्यांना अर्बन को–ऑपरेटिव्ह बँका हें नामाभिधान देण्याची मुभा देण्यांत आली आहे. विलीन प्रदेशांतील अर्बन बँका सोडल्यास, १९४६–४७ ते १९५२–५३ या मुदतींत अर्बन बँकांच्या संख्येंत ६० टक्के वाढ झाली आहे, ती लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे.

बँकांची संख्या, त्यांची सभासदसंख्या, त्यांचें भांडवल व त्यांच्याकडच्या ठेवी, या सर्वांत दिसून येणारी वाढ या गोष्टी तर सहकारी बँकांची प्रगति दर्शविणाऱ्या आहेतच; पण त्याशिवाय खालील गोष्टींचाहि या बाबतींत विचार करणें आवश्यक असतें.

(१) स्वतःच्या भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण.

(२) येणें असलेल्या थकबाकीचें परतफेड व्हावयाच्या कर्जाशीं असलेलें प्रमाण.

(३) व्यवस्थापकीय खर्चाचें खेळत्या भांडवलाशीं शेंकडा प्रमाण.

(४) निव्वळ नफ्याचें खेळत्या भांडवलाशीं शेंकडा प्रमाण.

वरील गोष्टी ध्यानांत ठेवून अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या चळवळींचीं कांहीं ठळक वैशिष्ट्यें खालील तक्त्यावरून दिसून येतील:—

### प्रगतीचे तुलनात्मक आंकडे

| | १९४९-५० | १९५०-५१ | १९५२-५३ |
|---|---|---|---|
| बँकांची संख्या | १७० | १७६ | १८४ |
| सभासदांची संख्या (हजारांत) | १८६ | २०७ | २२० |
| स्वतःच्या मालकीचें भांडवल (लाख रुपयांत) | २३३ | २६० | २८७ |
| खेळतें भांडवल (लाख रुपयांत) | १३९५ | १५८० | १५८८ |
| मालकीच्या भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं शेंकडा प्रमाण | १६·५ | १६·४ | १८·२ |
| ठेवी (लाख रुपयांत) | ११०८ | १२०१ | ११९५ |
| येणें असलेल्या थकबाकीचे परतफेड करावयाच्या कर्जाशीं शेंकडा प्रमाण | ८·३ | ८·५ | १०·८ |
| व्यवस्थापकीय खर्चाचें खेळत्या भांडवलाशीं शेंकडा प्रमाण | १·९ | १·८ | १·८ |
| निव्वळ नफ्याचें खेळत्या भांडवलाशीं शेंकडा प्रमाण | १·११ | १·२८ | १·२७ |

### थकबाकींत थोडीशी वाढ

युद्धपूर्व काळांत अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकांच्या बाबतींत एक गोष्ट अत्यंत असमाधानकारक अशी होती. ती ही कीं, त्यांच्या परतफेड व्हावयाच्या कर्जांच्या मानानें थकबाकीचें प्रमाण फार मोठें होतें. १९३८–३९ सालीं ही थकबाकी परतफेड व्हावयाच्या कर्जांच्या ३० टक्क्यांइतकी होती. युद्धकाळांत दरसाल हें प्रमाण कमीकमी होत जाऊन १९४९–५० सालीं तें ८ टक्क्यांपेक्षा थोडें अधिक इतकें होतें. परंतु अलिकडे पुन्हां तें वाढूं लागल्याचें दिसून येतें. १९५१–५२ सालीं येणें थकबाकीचें प्रमाण ११ टक्क्यांइतकें होतें. थकबाकीचें प्रमाण जास्त असतांना सुद्धां नफ्याबाबतची परिस्थिति मात्र समाधानकारक आहे आणि व्यवस्थापकीय खर्चांतहि योग्य प्रकारें काटकसर केली जात आहे. १९५२ सालीं शेड्यूल्ड बँकांना १·०३ टक्के निव्वळ नफा मिळाला, तर मुंबई राज्यांतील अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकांना किंचित् अधिक म्हणजे त्यांच्या खेळत्या भांडवलाच्या १·२७ टक्के इतका नफा मिळाला.

### ठेवी व कर्जें

एकूण ठेवींपैकी सुमारें ४० टक्के ठेवी बिगर–सभासदांच्या आहेत. १९५०–५१ सालच्या मानानें १९५१–५२ सालीं बिगरसभासदांच्या ठेवींत १६ लाख रुपयांची वाढ झाली. १९५०–५१ सालीं ही रक्कम ५४७ लाख रुपये होती ती १९५१–५२ सालीं ५६३ लाख रुपये झाली, तर सभासदांच्या ठेवींची रक्कम ६५३ लाख रुपयांची ६३१ लाख रुपये झाली, म्हणजे २२ लाख रुपयांनीं कमी झाली. अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकांना बेताची मिळकत असलेल्या लोकांच्या गरजा भागवावयाच्या असल्यामुळें त्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांना कर्जें देतांना त्यांच्या स्थावर मालमत्तेच्या तारणावर भर न देतां त्यांच्या पैसे कमावण्याच्या आणि कर्जफेड करण्याच्या कुवतीकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठी कर्जें मिळण्याची अधिकाधिक प्रमाणांत सोय करावी. को–ऑपरेटिव्ह बँकांमार्फत दिलीं जाणारीं बरींचशीं कर्जें स्थावर मालमत्ता, सोनें–चांदी व सरकारी कर्जरोख्यांच्या तारणावर दिलीं जातात.

अर्बन को–ऑपरेटिव्ह बँका जॉइंट स्टॉक बँकांइतकी जोखीम पत्करूं शकत नाहींत. त्यामुळें त्यांच्या ठेवींपैकी बहुसंख्य ठेवी 'करंट' खात्यांत ठेवल्या जाण्यापेक्षा 'फिक्सड्' व 'सेव्हिंग्ज' खात्यांतून ठेवल्या जातात. तसेंच पैसे गुंतविण्याच्या बाबतींतही या बँकांना बराचसा पैसा सरकारी रोख्यांत गुंतवावा लागतो. १९५१–५२ सालीं मुंबई सरकारनें १९२७ च्या मुंबई सहकारी संस्थासंबंधीच्या नियमांच्या २७ व्या नियमांत दुरुस्ती केली आणि तीनुसार ज्या अ किंवा ब वर्गांतील अर्बन बँकेचें शेअरभांडवल ५०,००० रुपयांपेक्षा आणि राखीव निधि ५०,००० रुपयांपेक्षा कमी नसेल आणि जी निदान १० वर्षे तरी चालू असेल अशा बँकेला आपल्याजवळील जादा पैशांपैकीं कांहीं पैसा कांहीं विशिष्ट अटी पुऱ्या करून इंडियन कंपनीज ॲक्टासाली नोंदविलेल्या आणि को–ऑपरेटिव्ह बँकर्स असोसिएशननें मान्यता दिलेल्या कोणत्याहि संस्थेच्या शेअरमध्यें किंवा डिबेंचरमध्यें गुंतवितां येण्याची तरतूद करण्यांत आली आहे. नाणेबाजारांत तंगीची परिस्थिति असून सुद्धां कांहीं अर्बन बँकांकडे, नियमानुसार ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक ठेवी आल्या आहेत आणि ज्यांच्या बाबतींत आक्षेपार्ह असें कांहीं नव्हतें अशा प्रकरणांत रजिस्ट्रारांना ठराविक मर्यादेपेक्षा जादा ठेवी घेण्यास मंजुरी धावी लागली आहे.

## महाराष्ट्रांतील अर्बन बँका

मुंबई राज्यांत अर्बन–को ऑपरेटिव्ह बँकेच्या चळवळीची जी सर्वसाधारण प्रगति झाली, तिचा फायदा महाराष्ट्रालाहि मिळाला आहे. महाराष्ट्रांत ७१ अर्बन को–ऑपरेटिव्ह बँका असून त्यांचा शहर-भागांतील ४० लक्षांहून अधिक लोकांना फायदा होत आहे. या ७१ बँकांचें स्वतःचें एकुण शेअर–भांडवल व राखीव निधि ९७ लाख रुपये असून त्यांचें एकुण खेळतें भांडवल ४६७ लाख रुपये आहे. त्यांनीं १९५१–५२ सालीं एकूण ५·७ लाख रुपये नफा मिळविला. सबंध राज्याचा विचार करतां शहर–भागांतील लोकवस्तीस दर ६०,००० पेक्षा थोड्या अधिक लोकांना एक अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक असें प्रमाण पडतें, तर महाराष्ट्रांत हें प्रमाण ५६,००० लोकवस्तीमागें एक अर्बन बँक असें आहे. अशा रीतीनें महाराष्ट्रांतील अर्बन बँकांचें प्रमाण चांगलें आहे. महाराष्ट्रांतील एका अर्बन बँकेचें सरासरी खेळतें भांडवल ६·६ लाख रुपये आहे तर सबंध राज्याच्या बाबतींत ही सरासरी ८·५ लाख रुपये पडते. खेळत्या भांडवलाशीं व्यवस्थापकीय खर्चाच्या व नफ्याच्या प्रमाणाच्या बाबतींतहि महाराष्ट्रांतील अर्बन बँकांची राज्यांतील इतर बँकांच्या बरोबरीनें समाधानकारक अशी प्रगति होत आहे. अहमदनगर जिल्हा सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक, सांगली अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक, भुसावळ पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक यांसारख्या कांहीं बँकांनीं सबंध राज्यांत नांव कमावलें आहे.


## कराड अर्बन को–बँकेचें वैशिष्ट्यपूर्ण स्थान

"इंडियन बँकिंग अनलाइज्ड" या १९५२ सालीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत १९१७ सालीं स्थापन होऊन सहकारी नागरी पेढींत ज्यांचीं पुढें विकसनें झालीं आणि ज्या काळाच्या घक्याचपाट्यांत टिकून राहिल्या अशा भारतांत नऊ बँका असल्याचें नमूद असून त्या सर्वांत कराड अर्बन को. बँक पहिल्याक्रमांकांत आहे. (माहिती नाहीं तेथें जागा कोरी सोडली आहे. माहिती १९५२ जून अखेरची असून अंक १००० रु. चे आहेत.)


| बँक | भागभांडवल गंगाजळी | ठेवी | रोकड शिल्लक | कर्जें | विन्यास | नफा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ कराड | ४,३१ | २३,६३ | १,९५ | १६,११ | १२,६२ | २३ |
| २ तिरुपेत्तूर | १,१२ | ३,०९ | १,६० | २,८६ | १३ | ९ |
| ३ तिरुवेलवेल्ली | ५३ | ८३ | ६ | १,१५ | १७ | — |
| ४ मंगलोर | ४५ | १,७७ | ४ | १,९७ | २० | १ |
| ५ बॉबिली | ४४ | ७० | १३ | ८९ | ६ | २ |
| ६ डेंकनी कोट्टा | ३२ | ६७ | १० | ८७ | ४ | १ |
| ७ त्रिचूर | २७ | ४९ | ३ | — | — | — |

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे



"शरद चरक"



वसंत नं. ३ चरक
उसाचे चरक
हंगाम नजीक आला !
—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (जि. द. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रू. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रू. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रू. ७५,००,०००
मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.